# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
# राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

| | |
|---|---|
| दुरध्वनी – ०२२ – २२७१७५०० | आरोग्य भवन, ३रा मजला, |
| फॅक्स – ०२२ – २२६४२९५५ | सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड, |
| E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com | सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ |


जा.क्र.राआसोमुं/मनुष्यबळ कक्ष/पदभरती/ 54503 /२०२२

दि. ०४.०५.२०२२ 05

## सुचना

राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र, मुंबई कार्यालयामार्फत अभियानांतर्गत रिक्त पदे भरण्याकरीता दि. १५ फेब्रुवारी २०२२ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदर जाहिराती मधील मार्गदर्शक सुचनांमध्ये मुद्दा क्र.घ मधील क्र.४ मध्ये **"अर्ज भरत असताना अंतिम वर्षाच्या मिळालेल्या गुणांची टक्केवारी अचूकपणे नमूद करावी. ग्रेड अथवा अन्य श्रेणी नमूद न करता गुणांची टक्केवारी नमूद करणे आवश्यक आहे. अंतिम प्रमाणपत्रामध्ये ग्रेड अथवा श्रेणी नमुद असल्यास संबंधित संस्थेकडून त्याचे गुणांमध्ये रूपांतर करून ते प्रमाणित करून घ्यावे व त्याची स्वसाक्षांकित प्रत सादर करावी." असे स्पष्ट नमूद करण्यात येऊन देखील बहुतांश उमेदवारांनी सदरचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर केलेले नाही.** त्यामुळे सदर जाहिरातीच्या अनुषंगाने प्राप्त अर्जांची छाननी प्रक्रिया करण्यात येत असून त्यामध्ये गुणांकन यादी तयार करण्यास विविध अडचणी निर्माण होत आहेत.

वरील जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांना सुचित करण्यात येते की ज्या उमेदवारांनी अर्जासोबत ग्रेड अथवा अन्य श्रेणीचे गुणांच्या टक्केवारीमध्ये रुपांतर करण्याबाबतचे संबंधित संस्थेचे प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले नाही अशा उमेदवारांनी दि.१२.०५.२०२२ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सदरचे प्रमाणपत्र **nhmrecruit.objection@gmail.com** या ईमेलवर किंवा प्रत्यक्ष कार्यालयात उपस्थित राहून सादर करावे. दि.१२.०५.२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेनंतर प्राप्त होणा-या प्रमाणपत्र/प्राप्त ईमेल विचारात घेतले जाणार नाहीत व त्या उमेदवारांचे अर्ज बाद/रद्द करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

उपरोक्त पदभरतीच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणा-या सुचना, याद्या इत्यादी करीता www.arogya.maharashtra.gov.in या संकेतस्थळास नियमीत भेट द्यावी.

अतिरिक्त अभियान संचालक
राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई



Scanned with CamScanner